पुनर्विनियोजन संदर्भातील प्रशासकीय विभागांकरिता मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५०/अर्थ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १५ मे, २०२६.

**वाचा** :- १) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. अंदाज-१०९५/सीआर-१४/अर्थसंकल्प-१, दि. ४ नोव्हेंबर, १९९५.
२) वित्त विभाग,परिपत्रक क्र. बीजीटी-१०.०१/प्र.क्र.१५६२/अर्थसंकल्प-२, दि. १ जुलै,२००६.
३) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. बीजीटी-१०.०१/प्र.क्र.१५६२/अर्थसंकल्प-२, दि. १६ जानेवारी, २००८.
४) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. बीजीटी-२०.१०/प्र.क्र.६६/अर्थसंकल्प-२, दि. १० ऑगस्ट, २०१०.

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका, खंड-१ च्या परिच्छेद १६१ ते १६८ च्या अधीन राहून विनियोजन अधिनियमातील एकाच अनुदानाच्या / विनियोजनाच्या मर्यादेत एका प्रधान, उप प्रधान, गौण किंवा दुय्यम शीर्षातून तशाच दुसऱ्या शीर्षामध्ये निधीचे पुनर्विनियोजन करण्यास प्रशासनिक विभाग सक्षम आहे. प्रशासनिक विभागाने पुनर्विनियोजनाच्या प्रस्तावांना मंजूरी देताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. एकाच मागणी क्रमांकाच्या लेखाशीर्षांमध्ये पुनर्विनियोजन करण्यात यावे. वेगवेगळ्या मागणी क्रमांकाच्या लेखाशीर्षांमध्ये पुनर्विनियोजन करता येणार नाही.
२. भारीत बाबींतून दत्तमत बाबींकडे किंवा त्या उलट पुनर्विनियोजन करता येणार नाही.
३. कार्यक्रमांतर्गतच्या लेखाशीर्षांमधून अनिवार्य लेखाशीर्षांमध्ये किंवा त्या उलट पुनर्विनियोजन करता येणार नाही.
४. खालील उद्दिष्टांमधून इतर कोणत्याही उद्दिष्टांकडे पुनर्विनियोजनाने तरतूद वळविता येणार नाही.

| | |
|---|---|
| ०१- वेतन | ०४-निवृत्तीवेतनविषयक खर्च |
| ०६-दुरध्वनी,वीज व पाणी शुल्क | १०-कंत्राटी सेवा |
| १४-भाडेपट्टी व कर | ३४-शिष्यवृत्ती /विद्यावेतने |
| ३६-सहायक अनुदाने (वेतन) | |

५. केंद्र पुरस्कृत योजनेच्या केंद्र हिश्श्यामधून केंद्र हिश्श्यामध्ये व राज्य हिश्श्यामधून राज्य हिश्श्यामध्ये पुनर्विनियोजन करावयाचे असल्यास नियोजन व वित्त विभागाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील.
६. ज्या उद्दिष्टांखाली पुनर्विनियोजन करावयाचे आहे त्या उद्दिष्टांतर्गत अर्थसंकल्पीय तरतूद संपूर्ण खर्च झाल्याशिवाय पुनर्विनियोजन करता येणार नाही.
७. पुरक मागणीव्दारे मंजूर झालेला निधी ज्या प्रयोजनार्थ उपलब्ध करून देण्यात आला आहे, त्या प्रयोजनासाठीच खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुरक मागणीव्दारे मंजूर निधी हा अन्यत्र पुनर्विनियोजित करता येणार नाही.
८. ज्या लेखाशीर्षांतर्गत उद्दिष्टांमधून निधी पुनर्विनियोजित करण्यात आला आहे, त्या उद्दिष्टांमध्ये पुरक मागणीव्दारे निधीची मागणी करता येणार नाही.

९. वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२, दि. १७.०४.२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-तीन मधील परिच्छेद क्र. १६२, १६३ व १६४ समोरील रकाना क्र. ६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींचे पालन करण्यात यावे.

१०.पुनर्विनियोजनाच्या आदेशाची प्रत सह सचिव (अर्थसंकल्प), वित्त विभाग यांना अग्रेषित करुन पुनर्विनियोजनाच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून घेण्यात यावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक २०२६०५१५१०१९२८२९०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2026.05.15 10:20:59 +05'30'

(वि.रं. दहिफळे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) सर्व मा.मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (वि.सु.) प्रधान सचिव (व्यय),
प्रधान सचिव (ले. व को.), वित्त विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक/ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७) निवड नस्ती, अर्थ-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.